**पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील तरतुदीस अनुसरुन राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरिता एक "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-बीएमसी-८५२२/प्र.क्र.२५०/नवि-२१**
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ एप्रिल, २०२६.

**वाचा:-** १) पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४.
२) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६.

**प्रस्तावना :-**

शहरी पथविक्रेत्यांचे नियमन तसेच त्यांना उद्योग धंदे चालविण्याकरिता पोषक वातावरण उपलब्ध करुन देणे, याच बरोबर पथविक्रेत्यांमुळे होणारी गर्दी व आरोग्याची काळजी यांचा समन्वय साधण्याकरीता केंद्र शासनाद्वारे पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ दिनांक ०५ मार्च, २०१४ रोजी लागू करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या उपरोक्त अधिनियमातील कलम ३६ (१) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ व ५ मधील तरतुदींनुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरीता "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती"

स्थापन करणे आवश्यक आहे. तसेच पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम ३४ नुसार राज्य शासनास सर्वसाधारण लेखी किंवा विशेष आदेशाद्वारे, या अधिनियमाखालील त्यांना असलेले अधिकार आणि कार्ये (कलम ३८ अन्वये योजना तयार करण्याचा अधिकार आणि कलम ३६ अन्वये नियम बनवण्याचा अधिकार वगळून), जे आवश्यक वाटतील, ते स्थानिक प्राधिकरणास किंवा नगर विक्रेता समितीस किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्यास, त्या आदेशात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सोपविण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ व ५ मधील तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरिता एक “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ व ५ मधील तरतुदींनुसार राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरिता एक “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम ३४ नुसार राज्यातील प्रत्येक महानगरपालिकासाठी आणि नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी एक “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन करण्याचे अधिकार अनुक्रमे संबंधित आयुक्त, महानगरपालिका आणि संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

३. सदर प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संबंधित आयुक्त, महानगरपालिका आणि संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित स्थानिक प्राधिकरणाकरिता प्रत्येकी एक “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन करण्याची कार्यवाही ०३ महिन्यांच्या आत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

४. राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकरिता एक “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधण्यासाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांची “समन्वय अधिकारी” म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यानुसार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी आयुक्त, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून स्थानिक प्राधिकरणाकरिता “तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती” स्थापन झाल्याबाबतची माहिती प्राप्त करुन त्याबाबतचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

५. उपरोक्त प्रमाणे अधिकाराचे प्रदान हे अधिनियम, नियम आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या योजनेच्या तरतुदींचे पालन आणि राज्य शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना या अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

६. राज्य शासन कोणत्याही वेळी या अधिकाराचे पुनर्विलोकन करण्याचा, त्यात बदल करण्याचा किंवा तो मागे घेण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२८१८४५५३६८२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2026.04.28 18:47:31 +05'30'

**( विद्या हम्पय्या )**
**शासनाच्या सहसचिव**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री, नगर विकास व गृहनिर्माण यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री, क्रिडा व युवक कल्याण, रा.ऊ.शु, अल्पसंख्याक व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा.महाधिवक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, (नवि-१), मंत्रालय, मुंबई.

८. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, (नवि-२), मंत्रालय, मुंबई.

९. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

१०. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

११.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

१२.आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

१३.जिल्हाधिकारी (सर्व).

१४.निवडनस्ती (कार्यासन नवि-२१).